## निशाणी क्र. ५९ वरील आदेश

०१. प्रस्तुतचा अर्ज वादी यांनी दिवाणी प्रक्रिया संहितेचा आदेश ०६ नियम १७ अन्वये दाव्यात दुरुस्ती करण्याकरीता दाखल केलेला आहे.

०२. वादीचे अर्जातील कथन असे आहे की, सदरचा दावा, वादी यांनी प्रतिवादीविरुद्ध दावा मिळकतीत त्यांचा वारसा हक्क असल्याचे ठरविण्याकरीता व मनाई हुकूमाकरीता दाखल केलेला आहे. वादी पुढे असे कथन करतो की, सदरचा दावा प्रतिवादीच्या साक्षीकरीता प्रलंबित आहे. प्रतिवादी क्र. १ यांनी वादीची भेट घेवून त्यांना प्रतिवादी क्र. ३ व ४ हे १ एकर जागा देण्यास तयार असल्याचे सांगितले. वादी पुढे असे कथन करतो की, प्रतिवादी क्र. १ यांनी त्यांना असेही सांगितले की, प्रतिवादी क्र. ३ व ४ हे मिळकतीचे हस्तांतर करु इच्छीत आहे. अशा परिस्थितीत वादी यांना आता दावा मिळकती एकत्रीत ठेवण्याच्या नाहीत. त्यामुळे त्या अनुषंगाने दाव्यात दावा कलम क्र. ९ च्या पुढे ९ अ समाविष्ट करुन त्यामध्ये अर्जातील नमुद मजकुर टाकण्याची तसेच विनंती कलममध्ये २ अ व २ ब हे नविन कलम समाविष्ट करुन वादी यांचा १/६ हिस्सा अथवा न्यायालय ठरविल तो हिस्सा वेगळा करुन द्यावा तसेच दावा मिळकतींचे वाटपासाठी कोर्ट कमिशनर यांची नियुक्ती करण्यात यावी अशा स्वरुपाची दुरुस्ती वादीने या अर्जाद्वारे मागितलेली आहे. शेवटी वादी दुरुस्ती अर्ज मंजुर करावा अशी विनंती करीत आहे.

०३. प्रतिवादींनी या अर्जावर आपले म्हणणे दाखल केले. त्यांनी सदरचा अर्ज खरा व कायदेशीर नसल्याचे कथन केले. प्रतिवादी पुढे असे कथन करतात की, अर्जातील कथने प्रतिवादी यांना मान्य नाहीत. अर्जात मागितलेल्या दुरुस्त्या वादी यांना या दाव्यात करता येणार नाहीत. प्रस्तावित दुरुस्त्यांमुळे दाव्याचे मुळ स्वरुप पुर्णतः बदलणार आहे. दाव्यास नव्याने कारण घडणार आहे. प्रतिवादी क्र. १ चे वादीसोबत कोणतेही संभाषण झालेले नाही. त्यामुळे वादीचा अर्ज रद्द करण्याची विनंती प्रतिवादी यांनी केलेली आहे.

०४. वादी व प्रतिवादी यांच्या विधीज्ञांचा युक्तीवाद ऐकण्यात आला. माझ्या विचारार्थ निघालेले मुद्दे, त्यावरील निष्कर्ष कारणमिमांसेसह मी खालीलप्रमाणे नमुद केले आहे.

| अ.क्र. | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| १. | वादी यांनी या अर्जाद्वारे मागितलेल्या प्रस्तावित दुरुस्त्या मंजुर होण्यास पात्र आहेत काय ? | होय. |
| २. | काय आदेश ? | अंतिम आदेशाप्रमाणे. |

## कारणमिमांसा

०५. वादी व प्रतिवादी यांचे वकीलांचा युक्तीवाद ऐकला. अर्जातील कथनांचे अवलोकन केले असता असे निदर्शनास येते की, प्रतिवादी क्र. १ च्या वादी क्र. १ व २ या मुली असून प्रतिवादी क्र. २ ही प्रतिवादी क्र. १ ची पत्नी तर प्रतिवादी क्र. ३ व ४ हे प्रतिवादी क्र. १ चे मुले आहेत. प्रतिवादी यांनी सदरचा दावा, दावा मिळकतीत त्यांचा वारसा हक्क असल्याचे तसेच दावा मिळकती हया त्यांच्या एकत्र कुटूंबाच्या सहदायकी मिळकती असल्याचे ठरवून मिळण्याकरीता दाखल केलेला आहे. वादी यांनी दाव्याच्या कारणामध्ये असे नमुद केले आहे की, प्रतिवादींनी त्यांना दावा मिळकतीत त्यांचा कुठलाही हक्क व अधिकार नसल्याचे व प्रतिवादी क्र. १ ने दावा मिळकतीपैकी मौजे होराळे येथील मिळकत परस्पर प्रतिवादी क्र. ३ च्या नावे केली व प्रतिवादी हे दावा मिळकतींची त्रयस्त इसमांना विक्री करण्याकामी बोलाचाली सुरु केल्या आहेत असे कारण दिलेले आहे. या कारणावरुन वादी यांनी दावा मिळकतीत त्यांचा वारसा हक्क असल्याचे व दावा मिळकती एकत्र कुटूंबाच्या मिळकती असल्याबाबत जाहीर ठराव करुन मागितला होता. दावा दाखल करतेवेळी वादी यांनी या मिळकतींची वाटणी करुन पृथ्थक वेगळा कब्जा मागितला नव्हता.

०६. वादी प्रतिवादी यांच्यातील नातेसंबंध दावा मिळकतींचे स्वरुप याचे अवलोकन केले असता असे निदर्शनास येते की, वादी यांनी दावा मिळकतीतील त्यांचा हिस्सा वेगळा करुन मागितला नव्हता परंतु त्यांनी त्यांचा दावा मिळकतीत वारसा हक्काने कायदेशीर हक्क असल्याचे ठरवून मागितले होते. अशा परिस्थितीत वादींचा दावा मिळकतीत हिस्सा असल्यास त्याचे वाटप करुन मागण्याचा कायदेशीर हक्क व अधिकार आहे. वादी यांची प्रस्तावित दुरुस्ती मान्य न केल्यास वादी यांना वेगळा दावा दाखल करावा लागेल. त्यामुळे या दाव्याबरोबरच दुसरा दावा दाखल होईल व त्यामुळे दाव्यांची संख्या (Multiplicity of proceedings) वाढेल. नवीन दाव्यातही वादी प्रतिवादी व दावा मिळकती त्याच असणार आहेत. वादीने या दाव्यात दिलेले दाव्याच्या कारणाच्या अनुषंगानेही वादी दावा मिळकतीचे वाटप मागू शकतो. या दाव्याचे स्वरुप पाहता प्रस्तावित दुरुस्तीने दाव्याचे मुळ स्वरुप पुर्णतः बदलणार नाही. वादीच्या प्रस्तावित दुरुस्तीला प्रतिवादी यांना त्यांची अधिकची कैफियत व त्याअनुषंगाने पुरावा देण्याचाही अधिकार राहिल. त्यामुळे वादीने अर्जात नमुद केल्याप्रमाणे दाव्यात दरुस्ती होणे आवश्यक आहे. वादी व प्रतिवादी यांच्यामधील वादाचे कायमस्वरुपी निराकरण होण्याकरीता वादी यांनी मागणी केलेली प्रस्तावित दुरुस्ती मंजुर करणे आवश्यक आहे. या दुरुस्तीने प्रतिवादी यांचे कोणतेही नुकसान होणार नाही. त्यामुळे अशा परिस्थितीत वादीचा अर्ज मंजूर होण्यास पात्र आहे. म्हणुन मी खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

## <u>आदेश</u>

१. वादीचा अर्ज मंजूर करण्यात येतो.

२. वादी यांनी विहित मुदतीत दुरुस्ती करावी व दुरुस्त प्रत दाखल करावी.

DISTRICT COURTS MAHARASHTRA

Digitally signed by WABALE RAMDAS DAULAT
Date: 2023.02.20 18:05:35 -0800

खालापूरः **(आर.डी.वाबळे)**

दि. १७/०२/२०२३ दिवाणी न्यायाधिश क.स्तर खालापूर

## CERTIFICATE

I affirm that the contents of this PDF file Judgment/Order are same word to word as per the original Judgment/Order.

| | | |
|---|---|---|
| (a) | Name of the Stenographer | : M. S. Shirgire, Steno. (L.G.) |
| (b) | Court | : Shri. R. D. Wabale<br>C.J.J.D. & J.M.F.C., Khalapur |
| (c) | Date of Judgment/Order | : 17/02/2023 |
| (d) | Judgment/Order signed by the Presiding Officer on | : 17/02/2023 |
| (e) | Judgment/Order uploaded on | : 20/02/2023 |